दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● मंगळवार दि.१३ जानेवारी २०२६ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १४० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये
● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 13 January 2026 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 140 ● Pages 4 ● Rate 4 Rs

### अजित पवारांना सोलापुरात जोरदार झटका

**मुंबई**–महापालिका निवडणुकीला अवघे २ दिवस शिल्लक असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसला सोलापुरात जोरदार झटका बसला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या येथील एका अधिकृत उमेदवाराने आज अचानक भाजपमध्ये प्रवेश केला. यामुळे शहराच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे. या अनपेक्षित घटनेमुळे शहरातील एका प्रभागातील राजकीय समीकरण बदलण्याची शक्यता आहे.यासंबंधीच्या माहितीनुसार, सोलापूर शहरातील प्रभाग क्रमांक ९ ड मधील राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार तुषार जक्का यांनी आज सोमवारी भाजपमध्ये प्रवेश केला. जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे व आमदार देवेंद्र कोठे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला. सोलापूर महापालिकेसाठी येत्या १५ तारखेला मतदान होणार आहे. त्यापूर्वीच राष्ट्रवादीच्या उमेदवाराने पक्ष सोडल्यामुळे पक्षाच्या निवडणूक रणनीतीला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.

# १५ फेब्रुवारीपर्यंत जिल्हा परिषदची निवडणूक घ्या

## सर्वोच्च न्यायालयाची राज्य निवडणूक आयोगाला १५ दिवसांची मुदतवाढ



**राज्यातील प्रलंबित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या बाबतीत राज्य निवडणूक आयोगाला सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. या निवडणुका पूर्ण करण्यासाठी न्यायालयाने आयोगाला १५ दिवसांची मुदतवाढ दिली असून आता १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे निवडणुकांच्या घोषणेची प्रतीक्षा करणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांना आता आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार आहे.सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश दिले होते.**

**मुंबई | प्रतिनिधी**

मात्र, प्रशासकीय अडचणी आणि प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अधिक वेळ हवा असल्याने आयोगाने १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ मागितली होती. आज या अर्जावर सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली.सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाची विनंती मान्य केली आहे. राज्य निवडणूक आयोगाला जिल्हा परिषद निवडणुकांसाठी १५ दिवसांची मुदतवाढ दिली असून,आता १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ज्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमधील ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा ओलांडली गेली नाही, त्या निवडणुका तुम्ही पूर्ण करा, असे कोर्टाकडून सांगण्यात आले.दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातून एक नवीन याचिका दाखल करण्यात आली आहे. नगरपालिका आणि महापालिकांप्रमाणेच ५० टक्के मर्यादा ओलांडलेल्या जिल्हा परिषदांच्या निवडणुकाही न्यायालयीन निकालाच्या अधीन राहून एकाच वेळी घेण्यात याव्यात, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली आहे.

### आरक्षणाचा पेच आणि नवीन याचिका

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ५० टक्के आरक्षण मर्यादेचा मुद्दा कळीचा ठरला आहे. १२ जि.प.आणि १२५ पंचायत समित्या येथे आरक्षण ५० टक्क्यांच्या आत असल्याने त्यांच्या निवडणुका घेण्यास तांत्रिक अडचण नाही. २० जि.प.मध्ये आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेली असल्याने त्यांच्या निवडणुकांवर प्रश्नचिन्ह आहे.

### आयोगापुढील पेच: एकत्रित की टप्प्याटप्प्याने?

सध्या राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा धुराळा उडालेला आहे. या निवडणुका संपण्यापूर्वीच जिल्हा परिषदांच्या निवडणुका जाहीर होतील, असा अंदाज वर्तवला जात होता. मात्र, आता १५ फेब्रुवारीपर्यंत मुदत मिळाल्यामुळे जिल्हा परिषद निवडणुका काहीशा लांबणीवर पडल्या आहेत. आता राज्य निवडणूक आयोग केवळ आरक्षणाची मर्यादा न ओलांडलेल्या जिल्हा परिषदांची निवडणूक घेते की सर्वच जिल्ह्यांचा पेच सुटेपर्यंत थांबते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांना लोक रत्न पुरस्कार देऊन केले सन्मानित

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**



बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉनसन साहेब यांना लोक रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. बाळशास्त्री जांभेकर यांच्या दर्पण दिनानिमित्त विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला यामध्ये प्रशासकीय अधिकारी सामाजिक कार्य करणारे व्यक्ती यांना सन्मान देऊन सन्मानित करण्यात आले याच पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष असे लाभलेले जिल्हाधिकारी विवेक जॉनसन साहेब यांना आज लोकशाही पत्रकार संघ सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशनच्या वतीने लोक रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले त्यामुळे येथे उपस्थित असलेले पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष नवनाथ शिरोळे पाटील यांच्या हस्ते हा लोक रत्न पुरस्कार कलेक्टर साहेबांना देण्यात आला यावेळी येथे उपस्थित लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष तसेच लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र प्रदेश सहसचिव सुनील दादा महा कुंडे तसेच लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर सह आदी सह उपस्थित होते बीड जिल्ह्यामध्ये बीड जिल्हा अधिकारी म्हणून चार्ज घेतल्यापासून शासनाच्या धोरणाच्या कामाची म्हणजेच महाराष्ट्रा राज्याचे मा मुख्यमंत्री देवेंद्र जी फडणवीस साहेब उर्फ देवा भाऊ व मा उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब तसेच महाराष्ट्र राज्याचे मा उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार मा श्री अजित दादा पवार साहेब यांच्या मंत्रिमंडळाने बीड जिल्ह्याच्या विकासाच्या धोरणात्मक निर्णय या बाबतीत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यामध्ये एक स्पर्ट आणि यशस्वी ठरलेले जिल्हाधिकारी मा विवेक जॉनसन साहेब हे आहेत म्हणून याबद्दल समाधान यावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष तथा लोकशाही पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब यांच्या प्रशासकीय कर्तव्याच्या बाबतीत समाधान व्यक्त केले .

## महा.पा.निवडणूक दरम्यान आ.संदीप भैय्या यांची पिंपरी येथील प्रारंभ चहा अँड कॅफे सदिच्छा भेट-किरण डावकर

### संदीप भैय्या यांच्याकडून पिंपरी चिंचवड येथील बीडच्या व्यवसायिकांना कौतुकाची थाप

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**



येणाऱ्या पंधरा तारखेच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकी दरम्यान प्रचारासाठी बीड येथील दबंग आमदार संदीप भैया क्षीरसागर यांनी बीड सह मराठवाड्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यासाठी पिंपरी चिंचवड येथे मराठवाडा मतदार मेळावा आयोजित करून या मेळाव्यासाठी सर्व बीड येथील मतदार संदीप भैय्याच्या शब्दाला मान देऊन उपस्थित राहिले असून येणाऱ्या निवडणूक मध्ये राष्ट्रवादी पक्षालाच मतदान करून प्रचंड बहुमताने विजय करू असा निर्धार केला आहे यावेळी माननीय उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांची विशेष उपस्थिती होती त्यांच्या समवेत आमदार रोहित दादा पवार आमदार संदीप भैया क्षीरसागर बीड राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेंद्र जी मस्के साहेब साहेब उपमहाराष्ट्र केसरी अक्षय भैय्या शिंदे व अनेक पदाधिकारी उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजक संदीप भैया क्षीरसागर यांनी पिंपरी चिंचवड येथील बीडच्या युवकांना व मतदारांना मार्गदर्शन केले व येणाऱ्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उमेदवाराला मतदान करून अजित दादा पवार यांचे हात बळकट करा असे आवाहन केले एवढेच नव्हे तर पिंपरी चिंचवड येथे वास्तवात असणाऱ्या बीड करांच्या समस्या जाणून घेतल्या व पिंपरी चिंचवड येथे बीड येथील व्यवसायिकाची भेटी घेतली यावेळी उपस्थित किरण डावकर राष्ट्रवादी युवक शहर संघटक पिंपरी चिंचवड, कुणाल चव्हाण,संतोष दादा पवार खडकवासला संघटक, बाळासाहेब डावकर, गणेश अंबुरे, महेश डावकर , ऋषिकेश डावकर, विष्णू डावकर, ज्ञानेश्वर डावकर, स्वप्निल काळकुटे, तुषार उघडे ,महादेव पवार प्रवीण माने, प्रतीक कांबळे ईश्वर इटकर व अनेक मान्यवर उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाची ठराव बैठक

### नितीन माणिक बागवाले यांची गटनेतेपदी निवड



दैनिक वादळ वार्ता
**परळी (प्रतिनिधी)**

सोमवार १२.जानेवारी २०२६ रोजी बीड येथे खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या आदेशानुसार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) यांची महत्त्वाची ठराव बैठक पार पडली.

या बैठकीत बीड जिल्हाध्यक्ष मा. राजेंद्र मस्के यांच्या नेतृत्वाखाली नगरपालिकेतील गटनेतेपदी नितीन बागवाले यांची एकमताने निवड करण्यात आली.या निवडीबाबतचे अधिकृत माहितीपत्र बीड जिल्हाधिकारी महोदयांना सादर करण्यात आले, त्यामुळे सदर निवड अधिकृत ठरली आहे. यावेळीयावेळी माजी नगराध्यक्ष दिपक नाना देशमुख, नगरसेविका कुरेशी आरेफा बेगम महेबुब पाशा, युवक नेते कादर पाशा कुरेशी यांची प्रमुख उपस्थिती होती. नवीन गटनेतेपदी निवड झाल्याबद्दल नितीन माणिक बागवाले यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून, आगामी काळात परळी शहरातील विकासकामांना गती मिळेल, असा विश्वास पक्ष पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

## केज तहसीलसमोर डिझेल अंगावर ओतून लांडगे कुटुंबीयांचा आत्मदहनाचा प्रयत्न

### जमिनीची मोजणी व सीमांकन करण्याची मागणी


दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**



जमिनीचे सीमांकन करण्याबाबत निश्चित वेळ देऊन ही संबंधित प्रशासकीय अधिकारी उपस्थित न राहिल्याने संतप्त झालेल्या लांडगे कुटुंबीयांनी सोमवारी दुपारी केज तहसील कार्यालयासमोर अंगावर डिझेल ओतून घेऊन आत्मदहनाचा प्रयत्न केला. पोलिसांनी धावाधाव करीत त्यांना रोखल्याने पुढील अनर्थ टळला. केज येथील विष्णू श्रीमंत लांडगे व त्यांच्या पाच भावांना सर्व्हे क्रमांक ३०/१ व ३०/२ मधील प्रत्येकी ३२.४४ आर जमीन केजच्या दिवाणी न्यायालयाच्या (क स्तर) दिवाणी दावा क्रमांक ७५/२०२४ मधील अंतिम हुकूमनाम्यानुसार वाटप झाली आहे. या न्यायालयीन आदेशानुसार मिळालेल्या जमिनीची नोंद महसूल अभिलेखात घेण्यात आली असून वाटप तक्ता तयार करण्यासाठी जमिनीची मोजणी करण्याचे आदेश तहसील कार्यालयाने १३ मार्च २०२५ रोजी भूमि अभिलेख कार्यालयाला दिले होते. या जमिनीच्या मोजणीसाठी ८ डिसेंबर २०२५ रोजी तारीख निश्चित करण्यात आली होती. मात्र मोजणीच्या वेळी अतिक्रमणधारकांनी विरोध करत मोजणीस मज्जाव केला होता. त्यामुळे अतिक्रमण काढून टाकून जमिनीची रीतसर मोजणी करून अहवालानुसार चतुःसीमा निश्चित करून देण्याची मागणी लांडगे कुटुंबीयांकडून करण्यात आली होती. तर या मागणीसाठी ८ ते १२ डिसेंबर दरम्यान लांडगे कुटुंबातील महिला व लहान मुलांनी तहसील कार्यालयासमोर चार दिवस उपोषण केले होते. यावेळी तहसीलदारांनी १२ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत जमिनीचे सीमांकन करून देण्याचे आश्वासन दिल्यानंतर कुटुंबीयांनी उपोषण मागे घेतले होते. मात्र दिलेल्या वेळेत कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने प्रतीक्षा करून १२ जानेवारी दुपारी ४ वाजता तहसील कार्यालयात विष्णू लांडगे, महादेव लांडगे, शंकर लांडगे, बळी लांडगे, शांताबाई लांडगे, संध्या लांडगे व सोजर लांडगे अशा सात जणांनी अंगावर डिझेल टाकून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.

# संपादकीय

## कोकणात ओल्या काजूगराची क्रेझ



कोकणातील हापूस आंबा, नारळ, फणस, कोकम, काजू, सुपारी, बांबू, जांभुळ, करवंद या सर्वांमध्ये एक वैशिष्ट्य आहे. कोकणातील शेतकऱ्यांनी आणि कोकणातील ग्रामस्थानीही आपली जमिनीशी असलेली नाळ तोडता कामा नये. कोकणातील निसर्गाने जे भरभरून दिलं आहे ते जपण्याची जबाबदारी या पिढीची आहे. कोकणची अवस्था आज 'तुझे आहे तुजपाशी परी जागा चुकलाशी' अशीच झाली आहे.

कोकणाला निसर्गाने भरभरून दिले. फळांच्या बाबतीतही एक वैशिष्ट्य असते. तो स्वाद, पिकणाऱ्या फळांमधलं माधुर्य, रंग यात विविधता आहे. कोकणातील पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या चारही जिल्ह्यांमध्ये पिकणारा भात, आंबा, काजू, कोकम, नारळ, सुपारी अशा सर्व फळपिकांना एक वेगळच वैशिष्ट्य आहे. त्यामुळेच कोकणातला हापूस आंबा काल-आज आणि उद्याही जगभराच्या बाजारातील आंब्याच्या स्पर्धेत टिकून राहील यात शंका नाही. कोकणात पिकणाऱ्या फळांना मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर या महाराष्ट्रातील प्रमुख शहरांव्यतिरिक्त देशभरातील अनेक बाजारपेठेत कोकणातील हापूस आंबा, काजू, जांभुळ, फणस या सर्वच फळांना खूप मागणी आहे. कोकणातील फळांच्याबाबतीत त्या फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग उभे राहिले नाही. तसे प्रक्रिया उद्योगांच्या बाबतीतले प्रयत्नही फारच तोकडे आहे. कोकणात सहकार रूजला नाही. जो प्रयत्न पश्चिम महाराष्ट्रात झाला तो कोकणात गावातील सहकारी सोसायटी, जिल्ह्याची बँक आणि तालुक्यातील खरेदी-विक्री संघ या मर्यादेत आणि चौकटीतच सहकार राहीला.कोकणातील उत्पादित होणाऱ्या सर्वच फळांवर प्रक्रिया होणं गरजेचं होतं; परंतु ज्या प्रमाणात प्रक्रिया उद्योग सध्या आहे त्याचं स्वरूप आणखी मोठं होण्याची निश्चितच आवश्यकता आहे. त्यासाठी कोकणातील राजकिय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रात काम करणाऱ्यांनी याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. एकीकडे कृषी क्षेत्रात नव-नवे प्रयोग कोकणात होत असताना कृषी क्षेत्राशी सर्वच बाबतीत विचार होण्याचीही आवश्यकता निश्चितपणे आहे. एकीकडे कोकणात अमुक उद्योग नको, दुसऱ्या कुठल्या उद्योगांना जर विरोध होत असेल तर मग निश्चितपणे ज्या उद्योगांनी कोकणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील अशा उद्योगांची पाठराखण करून तसे उद्योग जे उभारू इच्छित आहेत त्यांना निश्चितपणे पाठबळ देखील देण्याची आवश्यकता आहे. कोकणातील हापूस आंबा, तर स्वत:ची बाजारपेठ निर्माण करून आहे. कर्नाटक, गुजरात राज्यांतील आंब्याच्या अतिक्रमणाच संकट कोकणातील हापूसवर आहेस काही राज्यातील आंबा कोकणचा हापूस हा ब्रॅण्ड वापरून बाजारात विक्री होताना दिसतो पण याला जबाबदारही कोकणातील आंबा बागायतदार शेतकरीच आहे.कोकणातील आंबा बागायतदार शेतकरी परराज्यातून येणारा आंबा कोकणच्या हापूस नावाने विक्री होत असतानाही त्याकडे फार गांभिर्याने पहात नाही. त्यामुळेच पुणे, मुंबईच्या नव्हेतर कोकणच्या हमरस्त्यांवर परराज्यातील आंबे विक्रीला येतात. जस आंब्याच्याबाबतीत आहे तीच स्थिती कोकणातील काजूच्याबाबतीतही आहे. कोकणात ब्राझील, आफ्रीकेचा काजू येतो. खरंतर कोकणातील काजूगराची टेस्ट अन्य काजूगरांना नाही. त्यामुळे कोकणातील काजूगरालाही मागणी आहे; परंतु कोकणातील पिकणाऱ्या फळांवर सर्वांकडूनच अतिक्रमण होत आहे. कोकणातील ओल्या काजूगरालाही मोठी मागणी आहे. गेल्याकाही वर्षांमध्ये ओल्या काजूगराला कोकणात मागणी आहे. ओल्या काजुगराची मागणी तर गेल्या तीन-चार वर्षांत वाढली. यामुळे काजू बागायतदार देखील ओले काजूगर काढून विक्री करताना दिसतात. काजू बी तयार होईपर्यंत वाट पहाण्याची आवश्यकता नसते. काजू बी तयार होणार त्याच्या वजनातील होणारी घट याचा विचार करता ओले काजूगर काढून विक्री होऊ लागली. अगदी तीन-चार वर्षांतच ओले काजूगर विक्रीचे एक नवे मार्केट तयार झालं. पुणे, मुंबई, कोल्हापूरसारख्या शहरांमध्ये ओल्या काजूगराला मोठी मागणी आहे. ओल्या काजूगराची वाढत जाणारी मागणी लक्षात घेऊन कोकण कृषी विद्यापिठांतर्गत असलेल्या वेंगुर्ले फळ संशोधन केंद्रात वेंगुर्ले-१० एमबी ही नवी काजू जातीच वाण निर्माण करण्यात आले. काजू 'बी'च्या बाबतीत विद्यापिठाने वेंगुर्ले-७ हे वाण देखील कोकणात लागवड करण्यात आली. कोकणातील सर्वच जिल्ह्यांमध्ये काजू लागवड मोठ्या प्रमाणावर करण्यात आलेली आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातही काजू बागायतदारांनी काजू लागवड केली. त्यामुळे आंब्या बरोबरच काजू बागायतदारांची संख्याही काही कमी नाही. कोकण कृषी विद्यापिठाच्या काजूच्या बाबतीतील नवनवीन संशोधनातून कोकणात काजू बागायत क्षेत्र वाढत चालले आहे. ओल्या काजूगरांची बाजारपेठ कोकणवासीयांच्या हाती राहावी यासाठी कोकण कृषी विद्यापिठाच्या 'वेंगुर्ला-१० एमबी' या नव्या काजू वाणाचा चांगलाच उपयोग आणि फायदाही होणारा.कोकणातील जांभुळच्याबाबतीतही तीच स्थिती आहे. त्याबाबतीतही कोकणातील शेतकरी फार जागा नाही. कोकणातील बांबूच्या बाबतीतही वेगळी स्थिती नाही. पूर्व पिढ्यांनी लागवड शेतातील हद्दीवर लागवड केलेल्या बांबूच्या बेटांचे आजही कोकणातील शेतकरी उत्पादन घेत आहे; परंतु त्यातही काहींनी बांबू लागवड करून व्यावसायिकता जोपासली. खाडी पट्ट्यातील बांबूलाही फार मोठी मागणी आहे. वन्यप्राण्यानी बांबूचेही नुकसान केलेय हे खर असले तरीही काही शेतकऱ्यांनी त्यातही बांबू उत्पादन घेतले. कोकणात सगळेच पिकतय. बऱ्याचअंशी हे सारे पीक निसर्गावर अवलंबून आहे हे खर असले तरीही त्यातही कोकणाला फळांच्याबाबतीत निसर्गानेही बरेच वेगळेपण तर दिले आहेच आणि ते देताना इतरांपेक्षा एक वेगळी टेस्ट दिली. यामुळेच कोकणातील हापूस आंबा, कोकणातील नारळ, फणस, कोकम, काजू, सुपारी, बांबू, जांभुळ, करवंद या सर्वांमध्ये एक वैशिष्ट्यता आहे. जी गुणधर्मता इतर कशामध्येही उपलब्ध नाही एकीकडे हे सगळ असले तरीही कोकणातील शेतकऱ्यांनी आणि कोकणातील ग्रामस्थानीही आपली जमिनीशी असलेली नाळ तोडता कामा नये.कोकणातील निसर्गाने जे भरभरून दिलं आहे ते जपण्याची जबाबदारी आजच्या पिढीचीच आहे. कोकणची अवस्था आज 'तुझे आहे तुजपाशी परी जागा चुकलाशी'अशीच झाली. सर्वकाही आहे; परंतु आपल्याकडे काहीच नाही. या मानसिकतेतून कोकणाने बाहेर येण्याची आवश्यकता आहे.

# हिवाळ्यात केसांसाठी खोबरल तेल की बदामाचे तेल? काय ठरते सर्वात जास्त फायदेशीर?

दैनिक वादळ वार्ता

केसांच्या काळजीसाठी बदाम तेल आणि नारळ तेल चांगले मानले जाते. ही दोन्ही तेले केसांना सुंदर बनवण्याच्या क्षमतेसाठी ओळखली जातात. कोरडे आणि निर्जीव केस संगोपन करण्यापासून ते चमकदार आणि निरोगी केस मिळविण्यापर्यंत, ही दोन तेले काळाच्या कसोटीवर उभी राहिली आहेत आणि त्यांची योग्यता सिद्ध केली आहेत. कोणते तेल चांगले आहे याचा विचार करत असल्यास, ते आपल्या केसांच्या प्रकार, समस्या आणि इतर गोष्टींवर अवलंबून असते. हिवाळ्यात केसांची निगा राखण्यासाठी कोणते तेल चांगले आहे ते आम्ही तुम्हाला सांगतो. नारळ तेल हे केसांच्या आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आणि नैसर्गिक तेल मानले जाते. नारळ तेलामध्ये लॉरिक ॲसिड, व्हिटॅमिन ई, अँटिऑक्सिडंट्स आणि फॅटी ॲसिड्स भरपूर प्रमाणात असतात, जे केसांच्या मुळांपर्यंत खोलवर पोषण देतात.

नियमित नारळ तेलाचा वापर केल्यास केस गळणे कमी होते आणि केस मजबूत बनतात. हे तेल केसांच्या मुळांमध्ये मुरून प्रोटीन लॉस कमी करते, त्यामुळे केस तुटणे आणि दोन्ही टोकांनी फुटणे (स्प्लिट एन्ड्स) कमी होतात. तसेच नारळ तेल टाळूला मॉइश्चर देते, ज्यामुळे कोरडेपणा, खाज आणि कोंडा कमी होण्यास मदत होते. केसांना नैसर्गिक चमक आणि मऊपणा देण्यासाठी नारळ तेल अत्यंत प्रभावी ठरते. नारळ तेलामध्ये अँटीबॅक्टेरियल आणि अँटीफंगल गुणधर्म असल्यामुळे टाळू निरोगी राहते आणि केसांच्या वाढीस पोषक वातावरण तयार होते.



नियमित तेलमसाज केल्याने टाळूतील रक्ताभिसरण सुधारते, त्यामुळे नवीन केसांची वाढ होण्यास मदत मिळते. नारळ तेल केस अकाली पांढरे होण्याची प्रक्रिया मंदावण्यासही सहाय्य करते. तसेच सूर्यप्रकाश, प्रदूषण आणि केमिकलयुक्त उत्पादनांमुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी नारळ तेल संरक्षणात्मक थर तयार करते. आठवड्यातून २-३ वेळा कोमट नारळ तेलाने मसाज केल्यास केस निरोगी, जाड, मजबूत आणि चमकदार राहतात. त्यामुळे नारळ तेल हे केसांच्या सर्वांगीण आरोग्यासाठी एक सुरक्षित आणि प्रभावी उपाय मानले जाते.

बदाम तेल हे केसांच्या आरोग्यासाठी अत्यंत पोषक आणि प्रभावी मानले जाते. बदाम तेलामध्ये व्हिटॅमिन ई, ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स, मॅग्नेशियम आणि प्रोटीन मुबलक प्रमाणात असतात, जे केसांच्या मुळांना मजबुती देतात. नियमित बदाम तेलाचा वापर केल्यास केस गळणे कमी होते आणि केस तुटण्यापासून संरक्षण मिळते. हे तेल टाळूतील कोरडेपणा कमी करून खोलवर पोषण देते, त्यामुळे खाज, कोंडा आणि सुकलेली त्वचा यांसारख्या समस्या कमी होतात. बदाम तेल केसांच्या मुळांमध्ये रक्ताभिसरण सुधारते, ज्यामुळे केसांची वाढ चांगली होते आणि केस जाड, मजबूत बनतात. बदाम तेल केसांना नैसर्गिक चमक, मऊपणा आणि लवचिकता देण्यासाठीही उपयुक्त आहे. व्हिटॅमिन ईमुळे केस अकाली पांढरे होण्याची प्रक्रिया मंदावण्यास मदत होते आणि केसांचा नैसर्गिक रंग टिकून राहतो.

बदाम तेल सूर्यप्रकाश, प्रदूषण आणि रासायनिक उत्पादनांमुळे होणाऱ्या नुकसानीपासून केसांचे संरक्षण करते. आठवड्यातून २-३ वेळा कोमट बदाम तेलाने मसाज केल्यास टाळू शांत राहते आणि केस निरोगी दिसतात. तसेच बदाम तेल हलके असल्यामुळे ते सर्व प्रकारच्या केसांसाठी योग्य ठरते. नियमित वापराने केस मजबूत, चमकदार आणि आरोग्यदायी राहतात, म्हणून बदाम तेल केसांसाठी एक उत्तम नैसर्गिक उपाय मानले जाते.

**नारळ तेल**

नारळ तेल एक जड तेल आहे, जे केसांच्या शाफ्टमध्ये खोलवर प्रवेश करते आणि त्यांना ओलावा प्रदान करते. हे केसांना कोरडे आणि कोंडा होण्यापासून वाचवते आणि चमकदार बनवते. हे फॅटी ॲसिड, अँटिऑक्सिडेंट्स आणि लॉरिक ॲसिडमध्ये समृद्ध आहे, जे केसांच्या मुळांमध्ये खोलवर पोहोचते आणि प्रथिनांच्या कमतरतेमुळे होणारे नुकसान भरून काढते.

**बदाम तेल**

बदामाचे तेल हे एक सौम्य तेल आहे, जे केसांना ओलावा प्रदान करते आणि त्यांना मजबूत बनवते. हे केस गळण्यापासून प्रतिबंधित करते आणि त्यांना चमकदार बनवते. बदामाचे तेल केसांना ओलावा प्रदान करते, केस मजबूत करते, केस गळण्यापासून रोखते आणि केस चमकदार बनवते. व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम, ओमेगा -३ फॅटी ॲसिड आणि बायोटिन समृद्ध असलेले हे तेल केसांना मुळापासून टोकपर्यंत मजबूत करते.

**हिवाळ्यात कोणते तेल वापरावे?**

हिवाळ्यात बदाम तेल हा एक चांगला पर्याय आहे, कारण ते केसांना ओलावा प्रदान करते आणि कोरड्या आणि डोक्यातील कोंडा होण्यापासून संरक्षण करते, परंतु जर आपल्याकडे जाड आणि कोंडा असेल तर नारळ तेल हा एक चांगला पर्याय असू शकतो.

# दक्षिण अमेरिकेतील 'या' देशात भारतीय होतील श्रीमंत

दैनिक वादळ वार्ता

तुम्हाला श्रीमंत बनायचं असेल तर ही बातमी नक्की वाचा. पॅराग्वेचे अधिकृत चलन गुआरानी (PYG) आहे. भारतीय रुपयात तुलना केली तर त्याची किंमत लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. गुआरानी हे नाव पॅराग्वेच्या मूळ गुआरानी जमातीच्या नावावरून ठेवले गेले आहे, जे देशाच्या सांस्कृतिक ओळखीचा एक महत्त्वाचा भाग आहे. Vice.com च्या रिपोर्टनुसार, पॅराग्वेमध्ये १ भारतीय रुपयाची किंमत ७५ पॅराग्वेयन गुआरानी (PYG) च्या बरोबरीची आहे. भारतीय पॅराग्वेला १ लाख रुपये घेऊन गेला तर त्याची किंमत ७५ लाख पॅराग्वेयन गुआरानी (पीवायजी) इतकी असेल. चला तर मग याविषयीची माहिती जाणून घेऊया

दक्षिण अमेरिकेतील पॅराग्वे हा देश स्थिर अर्थव्यवस्था आणि आरामशीर जीवनशैलीसाठी ओळखला जातो. जर एखाद्या भारतीय प्रवासी किंवा गुंतवणूकदाराला पॅराग्वेबद्दल जाणून घ्यायचे असेल तर त्याच्या मनात पहिला प्रश्न येतो की पॅराग्वेचे चलन काय आहे आणि भारतीय रुपयाच्या तुलनेत त्याची स्थिती काय आहे? आम्ही तुम्हाला पराग्वेचे अधिकृत चलन, त्याचे मूल्य, भारतीय रुपयाशी तुलना आणि त्याच्याशी संबंधित महत्त्वाच्या गोष्टी सांगणार आहोत.

पराग्वेचे अधिकृत चलन ग्वारानी आहे. त्याचा आंतरराष्ट्रीय चलन कोड पीवायजी आहे. गुआरानी हे नाव पॅराग्वेच्या मूळ गुआरानी जमातीच्या नावावरून ठेवले गेले आहे, जे देशाच्या सांस्कृतिक ओळखीचा एक महत्त्वाचा भाग आहे. हे चलन पॅराग्वेमध्ये बऱ् याच काळापासून चलनात आहे आणि दक्षिण अमेरिकेत असलेल्या इतर देशांच्या तुलनेत ते स्थिर चलन मानले जाते.



Vice.com च्या रिपोर्टनुसार, पॅराग्वेमध्ये १ भारतीय रुपयाची किंमत ७५ पॅराग्वेयन गुआरानी (PYG) च्या बरोबरीची आहे. यानुसार जर एखादा भारतीय पॅराग्वेला १ लाख रुपये घेऊन गेला तर त्याची किंमत ७५ लाख पॅराग्वेयन गुआरानी (PYG) इतकी असेल. पॅराग्वेच्या चलनात संप्रदाय जास्त आहे. याचा अर्थ तेथील किंमती हजारोंमध्ये लिहिल्या जातात. पॅराग्वेमध्ये एका कॉफीची किंमत १५,००० ते २०,००० पीवायजी असू शकते.

बँको सेंट्रल डेल पॅराग्वे (BCP) ही पॅराग्वेची मध्यवर्ती बँक आहे, जी देशाच्या चलनविषयक धोरणावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि वित्तीय प्रणालीत संतुलन राखण्यासाठी जबाबदार आहे. हे देशाचे अधिकृत चलन, गुआरानी (PYG) देखील जारी करते. पॅराग्वेचे चलन, ग्वारानी, प्रथम १९४४ मध्ये अधिकृतपणे बाजारात आले. पूर्वी देशात पेसो निविदेत होता, परंतु आर्थिक सुधारणा व आर्थिक स्थैर्याची गरज लक्षात घेऊन सरकारने पेसो काढून गवारी स्वीकारली.

# रात्री उशीरा जेवल्याने काय त्रास होतो

दैनिक वादळ वार्ता

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे रात्री उशीरा जेवणे आणि उशीरा जेवणे हे सार्वत्रिक बनले आहे. त्यामुळे अनेकांना विविध आजार जडतात,अनेक लोक रात्रीच्या वेळी जेवतात त्यामुळे उशीराच जेवतात. त्यामुळे हळूहळू त्याचा शरीरावर त्याचा परिणाम होत आहे. ज्याचा लागलीच नाही परंतू उशीराने का होईना प्रकृतीवर त्याचा परिणाम होतो. रात्री उशीरा जेवल्याने शरीराचे संतुलन बिघडते आणि ब्लडशुगर सारखी समस्येचा धोका वाढू लागतो. याचा परिणाम डायबिटीजपर्यंतच मर्यादित राहत नाही तर सर्वसामान्यातही शुगरची लेव्हल प्रभावित होऊ शकते. यासाठी रात्री उशीरा जेवण्याच्या सवयीला हलक्यात घेऊ नये

रात्री उशीरा जेवणे आणि ब्लड शुगर यात मोठे नाते दिसून आले आहे. अनेक संशोधनात हे सिद्ध झाले आहे की यामुळे साखरेची पातळी प्रभावित होऊ शकते. याचे मुळ कारण या सवयीबाबत विशेष सर्तक रहाण्याचा सल्ला दिला जाते. चला तर पाहूयात रात्री उशीरा जेवल्याने शुगर लेव्हलवर काय परिणाम होतो. असे रात्रीच्या वेळी खाल्लेले जेवण रात्री लागलीच ऊर्जेत रुपांतरीत होऊ शकत नाही असे आरएमएल हॉस्पिटलचे संचालक डॉ. सुभाष गिरी यांनी म्हटले आहे. त्यामुळे ब्लड शुगरचे प्रमाण वाढू शकते.

जर एखादी व्यक्ती रात्री उशीरा जेवत असेल तर त्यांच्या शरीराचा संतुलन योग्य प्रकारे करण्यास अडचण होऊ शकते. रात्रीच्या वेळी शरीराचे कामकाज दिवसाच्या तुलनेत हळूवार होत असते. त्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण वाढते.खासकरुन जास्त गोड खाल्ल्याने शुगरची पातळी वेगाने वरती जाते. अनेकदा याचा परिणाम सकाळीच्या फास्टींग शुगरवर देखील पाहायला मिळतो. सातत्याने रात्री उशीरा जेवल्याने तुमच्या शरीराची नैसर्गिक दिनचर्या बिघडू शकते.ज्यामुळे साखरेचे नियंत्रण राखणे कठीण होते. याच कारणामुळे डॉक्टर रात्रीचे उशीरा जेवण्यास नकार देत असतात.आणि झोपण्याआधी किमान दोन तास आधी तरी जेवावे.नेहमची लोक असा विचार करतात की शुगर वाढण्याची समस्या



केवळ डायबिटीज रुग्णांसाठीच असते., परंतू असे बिलकुल नाही. जे लोक संपूर्णत: आरोग्यदायी आहेत त्यांच्या देखील रात्री जेवल्याची सवय भविष्यातील समस्येचे कारण बनू शकते. बराच काळ असे केल्याने शरीरातील शुगर कंट्रोल सिस्टीम कमजोर होऊ शकते.

हळूहळू इन्सुलिनवर याचा परिणाम होत असतो. आणि ब्ड शुगर सामान्य पातळीपेक्षा वर जाऊ लागते. अनेक प्रकरणात ही सवय पुढे जाऊन डायबिटीजचा वाढवू शकते. यासाठी सामान्य लोकांसाठी देखील वेळेवर जेवणे आणि सुंतलित आहार घेणे तेवढेच गरजेचे असते.

**शुगर कंट्रोल कशी करायची ?**

रात्रीचे जेवण झोपण्याआधी किमान २ ते ३ तास आधी खावे

हलके आणि संतुलिक अन्नाची निवड करावी

रात्री उशीरा गोड आणि तळलेले तिखट खाणे टाळावे

रोज थोडी शारीरिक एक्टिव्हीटी करावी

रोज खाण्याची आणि झोपण्याची वेळ फिक्स ठेवा

# हिरवे आणि निळेशार पाणी, अन् नीरव शांतता हवी तर हे ५ समुद्र किनारे पाहाच

दैनिक वादळ वार्ता

बटरफ्लाय बीच, गोवा - गोव्यातील गर्दीपासून दूर शांतता हवी असेल.तर तुमच्यासाठी बटरफ्लाय बीच एक परफेक्ट ऑप्शन आहे. साऊथ गोव्यातील या तुरळक गर्दीअसलेल्या सुंदर बिचवर पोहचण्यासाठी बोट किंवा पायीच पोहचावे लागते. त्यामुळेच येथे फारशी गर्दी नसते. निळेशार स्वच्छ पाणी, समुद्राच्या लाटांचा झुळूझुळू आवाज आणि पाचूसारख्या हिरवाईने नटलेला हा बिच खरोखरच साल २०२६ साठी तुमच्या बकेट लिस्टमध्ये हवाच !चांदीपुर बीच, ओडिशा - चांदीपुर बीच हा देखील भारताच्या सर्वात अनोख्या बिचपैकी एक आहे.. येथे आपल्या अलिबाग बिचप्रमाणे ओहोटीला समुद्राचे पाणी एकदम मागे जाते. आणि वाळूच नजरेस येते.हा नजारा पाहण्यासारखा असतो.थंडगार रेशमी वाळूत चालण्याची मजा काही औरच...ओडिशाच्या बालासोर येथून जवळ असलेला हा बिच अजूनही मास टुरिझमपासून दूर आहे. येथे 'तुम्ही जिंदगी कैसी हे पहेली..हाय' असे म्हणत राजेश खन्नाप्रमाणे दीर्घ वॉक करु



शकता.जोडीदारासोबत समुद्राच्या वाळूत शंख शिपले शोधू शकता आणि स्थानिक मच्छीमारांचे दैनंदिन जीवन जवळून पाहू शकता.

ओम बिच, कर्नाटक - गोकर्णपासून जवळ असलेला हा ओम बिच नावाप्रमाणेच त्याच्या स्पिरिच्युअल वाईब आणि नैसर्गिक सौदर्यसाठी ओळखला जातो. उंचावरून हा बिच ओम अक्षराप्रमाणे दिसतो. त्यामुळे त्याला हे नाव पडले.येथील नीरव शांतता, तुरळक गर्दी, खूपच आयसोलेटेड नसलेला बिच तुमचे मन मोहून टाकेल. आरामात निवांतपणे निसर्गाचा आस्वाद घेणाऱ्यांसाठी जंटल वेव्हस, बेसिक कॅफे आणि सनराईज-सनसेट व्यूज् पसंद पडतील.

मिनिकॉय बिच, लक्षद्वीप - मिनिकॉय बेट मुख्य भारतीय भूमीपासून एकदम वेगळाच अनुभव देते. टरक्कॉईज वॉटर,कोरल रिफ्स आणि समुद्र बेटांतील शांत दैनंदिन जीवन या बिचची ओळख आहे.येथील पर्यटन मर्यादित आहे.त्यामुळे लोकल कल्चर आणि नैसर्गिक सौदर्य कायम आहे.स्नॉर्कलिंग, बिच वॉक्स आणि मच्छीमारांची छोटी खेडी पाहणे येथील मुख्य एट्रॅक्शन आहे.

पॅराडाईस बिच, पुदुचेरी - पॅराडाईस बिच पुदुचेरी शहराच्या जवळ असूनही हा गर्दीपासून दूर आहे. कारण येथे पोहचण्यासाठी बोट राईडने पोहचावे लागते.येथील नरम मुलायम वाळू, मोकळी जागा, सागराची गाज तुमचे मनमोहन टाकेल. येथे कायमस्वरुपाची दुकाने वा जास्त गर्दी नाही. त्यामुळे वातावरणात एकदम नैसर्गिक शांतता आहे. येथील सुर्योदय आणि सूर्यास्त सर्वात सुंदर दिसतो.

# स्वीपनगरी म्हणजे मतदार जनजागृतीचा ऐतिहासिक वारसा-मनपा आयुक्त यशवंत डांगे

## नवीन मनपा कार्यालयात मतदार सहायता 'स्वीप कक्ष' पाहण्यासाठी नागरिकांना आवाहन

दैनिक वादळ वार्ता
अहिल्यानगर । प्रतिनिधी

राज्य निवडणूक आयोगाच्या माध्यमातून मतदान आणि निवडणूक प्रक्रिया निरंतर सुरू असतात. लोकशाहीचे महत्त्व वारंवार अधोरेखित करण्यासाठी 'स्वीप'सारखा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे. अहिल्यानगर मनपा स्वीप समितीचा 'स्वीपनगरी' हा कक्ष मतदार जनजागृतीच्या इतिहासात एक मैलाचा दगड ठरू शकतो, असे प्रतिपादन निवडणूक अधिकारी तथा मनपा आयुक्त व प्रशासक यशवंत डांगे यांनी केले. मनपाच्या नवीन प्रशासकीय इमारतीत उभारण्यात आलेल्या या कक्षाची पाहणी करताना श्री. डांगे यांनी मतदार जनजागृतीपर खेळांचा आनंद घेतला. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना ते बोलत होते.अतिरिक्त आयुक्त विजयकुमार मुंढे यांच्या संकल्पनेतून मनपाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ स्वीप समितीच्या वतीने मतदार जनजागृतीच्या शेकडो संकल्पना असलेला सुमारे ४ हजार स्क्वेअर फुटांचा 'स्वीप कक्ष' उभारण्यात आला आहे.या कक्षामध्ये भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोग (महाराष्ट्र) यांचे विविध जनजागृतीपर पोस्टर्स, मतदान प्रक्रिया साध्या व सोप्या पद्धतीने समजावून सांगणारे मुलांसाठीचे मनोरंजक खेळ, 'माझी सही-माझी मनपा' हा १०० टक्के मतदानाच्या संकल्पाचा उपक्रम, बाराखडीतून लोकशाही शिक्षण, 'माझी मनपा सेल्फी' पॉईंट्स, क्यूआर कोड वॉल, व्हीआर (तठ) बॉक्स, ईव्हीएम मशीनविषयक साक्षरता, 'नोटा' पद्धतीची माहिती, भारतातील पहिला 'स्वीप केअर' व्हॉट्सप क्रमांक, निर्भय मतदानासाठी आयोजित चित्रकला स्पर्धेतील पोस्टर्स, विविध निवडणूक प्सची माहिती, चिकाटी व गुणवत्तेचे प्रतीक असलेली 'एकी' मुंगी, मतदानाच्या पायऱ्या दर्शवणारा 'स्टापू' खेळ, नैतिक मतदानाचा सापशिडी खेळ, विविध अर्जांची माहिती देणारा 'भुलभुलैया', मतदान वर्णमालेचा तंबोला आणि चालत सहज मतदान पद्धती दर्शवणारे खेळ असे विविध महत्त्वपूर्ण उपक्रम या कक्षात मांडण्यात आले आहेत.विविध शासकीय कामानिमित्ताने शहरभरातील व बाहेरील नागरिक नूतन मनपा कार्यालयास भेट देत असतात. शहराचे मुख्यालय असलेल्या या इमारतीत हा कक्ष उभारण्यामागे नागरिकांचे प्रबोधन व्हावे, असा स्वीप समितीचा मानस आहे. दि. २६ जानेवारी २०२६ पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत हा कक्ष सर्वसामान्य नागरिकांसाठी खुला राहणार आहे.

शिक्षक व पालकांनी आपल्या मुलांसह या कक्षाला जरूर भेट द्यावी, खेळ खेळावेत आणि लोकशाही प्रक्रियेची माहिती घ्यावी, असे आवाहन स्वीप नोडल अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त अशोक साबळे, सहाय्यक आयुक्त सपना वसावा, सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजन, मतदारदूत डॉ. अमोल बागुल, प्रसिद्धी अधिकारी नितीन ब्राह्मणे आणि प्रशासनाधिकारी जुबेर पठाण यांनी केले आहे.



# खातेदारांनी बँकेद्वारे उपलब्ध असलेल्या विविध विमा पोलिसाचा लाभ घ्यावा; शाखा अधिकारी अनंत मुनेश्वर




दैनिक वादळ वार्ता
नायगांव । हानुमंत चंदनकर

महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा नायगांव विविध विमा योजनेचे माहिती ग्राहकांना उपलब्ध व्हावे व विमा योजनेचा लाभ सर्व खातेदारांना मिळावा म्हणून बँकेद्वारे जीवन ज्योती विमा योजना, अपघात विमा योजना, मेडिक्लेम विमा योजना, आदी विमा योजनेचा लाभ खातेदाराने घ्यावा व आपली पॉलिसी काढून घ्यावी व सुरक्षित रहावे अशी आवहान नागरिकांना वित्तीय साक्षरता अभियान जनजागृतीच्या माध्यमातून केले यावेळी तालुक्यातील अनेक गावात जाऊन नागरिकांना मार्गदर्शन केले यावेळी बँकेचे शाखा अधिकारी अनंत मुनेश्वर, कॅशियर आदित्य उगडे, गावातील नागरिक सरपंच पोलीस पाटील, बँकेचे सेवक रमेश चित्तावाड यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समाधानकारक उपचारांचे फलित : रुग्णाकडून देगलूर उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांचा सन्मान

दैनिक वादळ वार्ता
देगलूर । प्रतिनिधी

देगलूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दर आठवड्याला आयोजित करण्यात येणाऱ्या शस्त्रक्रिया शिबिरांमध्ये रुग्णांना समाधानकारक शस्त्रक्रिया व दर्जेदार उपचार मिळत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. पिंपळगाव येथील रुग्ण श्री. रमेश कुलकर्णी यांनी या समाधानकारक उपचारांचा अनुभव घेत आज रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर व डॉ. थडके यांचा कृतज्ञतापूर्वक सत्कार केला.

शस्त्रक्रिया व उपचार काळात रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका व इतर आरोग्य कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य निष्ठेने व जबाबदारीने पार पाडत उत्कृष्ट सेवा दिल्याबद्दल श्री. कुलकर्णी यांनी वैयक्तिकरित्या डॉक्टरांचा सन्मान करून आभार व्यक्त केले. शासकीय रुग्णालयांबाबत अनेकदा असमाधान व्यक्त केले जाते; मात्र देगलूर उपजिल्हा रुग्णालयात मिळणाऱ्या सेवेमुळे आज रुग्ण स्वतःहून डॉक्टरांचा सन्मान करत असल्याचे हे दृश्य कौतुकास्पद ठरत आहे. वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर यांनी कुठलीही खासगी प्रॅक्टिस न करता आपला संपूर्ण वेळ रुग्णालयाच्या कामकाजासाठी देत रुग्णांना उत्तम उपचार कसे मिळतील यावर विशेष भर दिला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली डॉ. थडके तसेच संपूर्ण वैद्यकीय, परिचारिका व आरोग्य कर्मचारी संघाने समन्वयाने कार्य करत रुग्णसेवेला प्राधान्य दिले असून त्याचेच हे सकारात्मक फलित असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे.

देगलूर उपजिल्हा रुग्णालयाने उभा केलेला हा आदर्श इतर शासकीय रुग्णालयांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



# दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर राज्यस्तरीय पुरस्कारासाठी बाळासाहेब पांडे यांची निवड

दैनिक वादळ वार्ता
नायगाव । प्रतिनिधी



मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिला जाणारा राज्यस्तरीय 'दर्पण बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार' जेष्ठ पत्रकार डी. मा. बाळासाहेब पांडे यांना जाहीर झाला आहे. ग्रामीण प्रश्न, सामाजिक अन्यायाविरोधातील निर्भीड लेखन आणि जनसामान्यांच्या बाजूने उभे राहणारी पत्रकारिता यासाठी त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली आहे.

सप्तरंगी साहित्य मंडळ महाराष्ट्र राज्य व मुकनायक वाचनालय मांजरम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलन येत्या २२ फेब्रुवारी २०२६ रोजी मांजरम (ता. नायगाव, जि. नांदेड) येथे होणार असून, या संमेलनात मान्यवरांच्या हस्ते पांडे यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

या निवडीबद्दल नायगाव व्हॉईस ऑफ मिडियाच्या वतीने दर्पण दिनी उपविभागीय पोलिस उपअधीक्षक श्याम पानेगावकर यांच्या हस्ते पांडे यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी पत्रकार, साहित्यिक व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. या सन्मानामुळे ग्रामीण पत्रकारितेचा गौरव उंचावल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# नैसर्गिक शेतीतून शाश्वत उन्नतीचा मार्ग- 'शेतकरी देवो भवः' उपक्रम

दैनिक वादळ वार्ता
लोहा । प्रतिनिधी




वाढता उत्पादन खर्च, जमिनीचा ऱ्हास व आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेता नैसर्गिक व सेंद्रिय शेती ही काळाची गरज असल्याचे मत 'शेतकरी देवो भवः - नैसर्गिक शेतीतून शाश्वत उन्नती' या विषयावरील विशेष कार्यक्रमात व्यक्त करण्यात आले. हा कार्यक्रम वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र व शेकरू फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. इंद्र मणी यांनी नैसर्गिक शेतीमुळे उत्पादन खर्च कमी होऊन जमिनीची सुपीकता व मानवी आरोग्याचे संरक्षण होते, असे सांगितले. प्रगतशील शेतकरी रत्नाकर ढगे यांनी नैसर्गिक शेतीतून मिळालेल्या यशाचा अनुभव मांडला. तज्ज्ञांनी आधुनिक तंत्रज्ञान व मूल्यवर्धनावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमातून संशोधन, संस्था व शेतकरी यांचा समन्वय साधून शेतीत टिकाऊ परिवर्तन शक्य असल्याचा संदेश देण्यात आला.

# अहिल्यानगरचा सर्वांगीण विकास हाच आमचा संकल्प-ना.पंकजाताई मुंडे

# प्रभाग क्र २ भाजपा राष्ट्रवादी युतीच्या प्रचार रॅलीचे ना.मुंडे ना.विखे पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले

दैनिक वादळ वार्ता
अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर हे केवळ ऐतिहासिक शहर आहेच पण विकासाच्या दृष्टीने राज्यातील आदर्श शहर बनविण्यासाठी महायुतीने केलेल्या संकल्पास पाठबळ देण्याचे आवाहन मंत्री पंकजा मुंढे यांनी केले. पाणीपुवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, रोजगार आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी केंद्र व राज्य सरकारच्या योजना प्रभावी अंमलबजावणी करण्यात कटीबध्द राहणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ शहरात भव्य प्रचार रॅली काढण्यात आली. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या रॅलीला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. ठिकठिकाणी फुलांचा वर्षाव, घोषणाबाजी आणि जल्लोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. सौ. रोशनी आकाश त्र्यंबके, श्री. महेश रघुनाथ तवले, सौ. संध्या बाळासाहेब पवार व श्री. निखिल बाबासाहेब वारे या अधिकृत उमेदवारांच्या समर्थनार्थ मोठ्या संख्येने मतदार सहभागी झाले होते.

जलसंपदा मंत्री व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही प्रचार रॅली संत वामनभाऊ नगर चौक, तपोवन रोड-गाडेकर चौक, मुळे एस.टी.डी., लोकनेते गोपीनाथजी मुंडे मार्ग व संत भगवानबाबा चौक या प्रमुख मार्गांवरून मार्गस्थ झाली. रॅलीदरम्यान नागरिकांशी थेट संवाद साधला.

प्रचार रॅलीत बोलताना ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या, महापालिकेत सक्षम, प्रामाणिक आणि काम करणारे प्रतिनिधी असतील तरच शहराचा विकास वेगाने होतो. भाजपा-राष्ट्रवादी युतीचे उमेदवार विजयी करा. अहिल्यानगरला आधुनिक सुविधा, मजबूत पायाभूत व्यवस्था आणि नव्या रोजगाराच्या संधी देण्याची जबाबदारी आम्ही घेतो. विकास हेच आमचे राजकारण आहे आणि तोच आमचा अजेंडा आहे.

पालकमंत्री या नात्याने शहर व जिल्ह्याच्या विकासाची स्पष्ट दिशा मांडताना ना. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले,

अहिल्यानगरच्या पाणी प्रश्नावर कायमस्वरूपी उपाय, दर्जेदार रस्ते, सक्षम आरोग्य सुविधा, शिक्षण व रोजगार निर्मिती यावर ठोस काम सुरू आहे. महापालिकेत भाजपा-राष्ट्रवादी युतीचे जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आले, तर निर्णयक्षम प्रशासन मिळेल आणि विकासकामांना दुप्पट गती मिळेल. नागरिकांचे प्रश्न कागदावर नव्हे, तर प्रत्यक्षात सोडवले जातील.

या भव्य प्रचार रॅलीस माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आमदार श्री. संग्राम भैय्या जगताप, भाजपा-राष्ट्रवादी युतीचे अधिकृत उमेदवार, विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मतदार बंधू-भगिनींकडून मिळालेल्या प्रचंड आणि उत्स्फूर्त प्रतिसादामुळे संपूर्ण अहिल्यानगर शहरात निवडणुकीचे वातावरण अधिकच तापले असून, भाजपा-राष्ट्रवादी युतीच्या उमेदवारांच्या बाजूने सकारात्मक आणि भक्कम लाट निर्माण झाल्याचे स्पष्ट चित्र दिसून आले आहे.



# पटसंख्ये अभावी बंद पडलेली केजची जि.प.माध्यमिक शाळा पुन्हा सुरू होणार; ६०० माजी विद्यार्थ्यांचा निर्धार

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील एकेकाळी नावाजलेली व गुणवत्तेचा ठसा उमटवणारी जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आज पटसंख्येअभावी बंद पडली असली तरी, तिचे गतवैभव पुन्हा मिळवून देण्यासाठी तब्बल ६०० माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत ऐतिहासिक संकल्प केला आहे. केंद्रीय मंत्री स्वर्गीय प्रमोद महाजन, कृषी आयुक्त उमकांत दांगट यांच्यासह अनेक न्यायाधीश, पोलीस अधिकारी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी घडवणारी ही शाळा पुन्हा उभी राहणार असल्याने शिक्षण क्षेत्रात आशेचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थीसंख्येअभावी शाळेचे वर्ग बंद पडले असून भव्य इमारत व प्रशस्त मैदान आज धुळखात पडले आहे. अनेक वर्गखोल्यांची पडझड झाली असून, विद्यार्थी नसल्यामुळे शिक्षकांच्या बदल्या इतर शाळांमध्ये करण्यात आल्या आहेत. शाळेतील फर्निचर चोरीस जात असून शासकीय मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. केज तालुक्यात तब्बल २३ खाजगी शाळा असून, शहरात इंग्रजी माध्यम व उर्दू शाळांची संख्या मोठी आहे. खाजगी शाळांकडून विविध प्रलोभने दाखवून जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी तिकडे वळवण्यात आले. परिणामी शासकीय शाळेतील पटसंख्या सातत्याने घटत गेली आणि अखेर शाळा बंद पडली.मात्र समाजमाध्यमांवर शाळेच्या दयनीय अवस्थेच्या बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर माजी विद्यार्थी व्यथित झाले. १९८० ते १९९५ या कालावधीत या शाळेत शिक्षण घेतलेल्या ६०० माजी विद्यार्थ्यांनी व्हॉट्सप ग्रुप तयार करून शाळा पुनरुज्जीवनाचा निर्धार केला आहे. येत्या २६ जानेवारी रोजी या सर्व माजी विद्यार्थ्यांचा भव्य मेळावा आयोजित करण्यात येणार असून, त्यामध्ये पुढील कार्ययोजना ठरवली जाणार आहे. सन २०२६ पासून जून महिन्यात शाळा पुन्हा सुरू करण्याचा मानस असून, पाचवी ते दहावीपर्यंतचे वर्ग सुरू करण्यात येणार आहेत. आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या गरीब व गरजू विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना या शाळेत प्रवेश देण्याचा निर्णय माजी विद्यार्थ्यांनी घेतला आहे. शाळेच्या वर्गखोल्यांची दुरुस्ती, नवीन फर्निचर, विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटप आदी सर्व कामे मे महिन्यापर्यंत पूर्ण करून शाळा कार्यान्वित केली जाणार आहे. या उपक्रमासाठी ६०० माजी विद्यार्थी तसेच विविध सामाजिक संस्था पुढाकार घेत असून, ही जिल्हा परिषद माध्यमिक शाळा भविष्यात इतर तालुक्यांसाठी आदर्श ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. शासकीय शिक्षण वाचवण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी उचललेले हे पाऊल समाजासाठी प्रेरणादायी ठरणार आहे.




# अनुष्का किरण पाटोळे प्रकरणी न्याय मिळण्यात यावा

**दैनिक वादळ वार्ता**
**परळी । प्रतिनिधी**



सकल मातंग समाजाच्या वतीने निदर्शने परळी शहरातील राणी लक्ष्मीबाई टावर या ठिकाणी सोमवार रोजी सकाळी ११ वाजता परळी सकल मातंग समाजाच्या वतीने निर्देशना करण्यात आली व प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना समाजाच्या वतीने निवेदन देण्यात आले या निवेदनावर कुमारी अनुष्का किरण पाटोळे ला न्याय देण्यात यावा या मृत्यू प्रकरणाची एसआयटी सीबीआय मार्फत सखोल चौकशी व्हावी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि विशेष लक्ष घालून हे प्रकरण फास्टट्रॅक चालवावे महाराष्ट्र सरकारच्या वतीने कुमारी अनुष्काच्या कुटुंबाला ५० लाखाची मदत देण्यात यावी. नवोदय विद्यालयाच्या परिसरात अनुष्काचा पुतळा बसवण्यात यावा. अशा मागण्या करण्यात आल्या यावेळी मातंग समाजाच्या महिला व पुरुषांनी मनोगत मांडले ही आत्महत्या नसून जातीय द्वैशातुन खून आहे. अनुष्का पाटोळेला न्याय मिळावा अशी मागणी करत हे निदर्शने संपन्न झाले. यावेळी मातंग समाजाचे नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते मातंग समाज ज्येष्ठ नेते के. डी. उपाडे, जितेंद्र मस्के, रमेश मस्के, संजय शिंदे, बालासाहेब गायकवाड, अभिमान मस्के, नर्सिंग गायकवाड, राजेश कांबळे, दशरथ आरगडे, विठ्ठल लोंढे, ऋषी शिरसागर, सोमेश्वर शिरसागर, दीपक क्षीरसागर, संतोष मस्के, निवास मस्के, दिनेश मस्के, रोहन मस्के, एस उपाडे, बंटी मस्के, बालू मस्के, करण मस्के , पंकज मस्के, राहुल वाघमारे, रोहिदास वाघमारे, अंगद वाघमारे, विकास कांबळे, राम बाळस्कर, सतीश उपाडे, लखन मस्के, अशोक मस्के, मारुती वाघमारे, वैजनाथ मस्के, गणेश गवारे, कमलेश मस्के, दशरथ आरगडे, बालाजी मस्के, रोहन मस्के, विनायक मस्के, महिलांची नावे सारिका शिंदे, पूनम गायकवाड, द्वारकाबाई मिसाळ, अस्मिता शिंदे, प्रणाली शिंदे, श्रावणी गायकवाड.आदी सहभागी झाले होते.

# लोणी काळभोर परिसरात मुळा-मुठा नदीत कचऱ्याची सर्रास विल्हेवाट; जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

पुणे शहराची जीवनरेषा मानली जाणारी मुळा-मुठा नदी लोणी काळभोर परिसरात भीषण प्रदूषणाच्या विळख्यात सापडली आहे. ग्रामीण भागातील घरगुती व इतर कचरा कोणतीही प्रक्रिया न करता थेट नदीपात्रात टाकला जात असल्याने नदीचे पाणी मोठ्या प्रमाणावर दूषित होत असून नागरिकांच्या आरोग्याला आणि पर्यावरणाला गंभीर धोका निर्माण झाला आहे.

या गंभीर प्रकाराबाबत पुणे शहर युवक आघाडी (आजाद समाज पार्टी)चे अध्यक्ष अंकित गायकवाड यांनी पुणे जिल्हाधिकाऱ्यांसह पाटबंधारे खात्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत नमूद करण्यात आले आहे की, लोणी काळभोर परिसरात कचरा संकलन करून तो बेकायदेशीरपणे मुळा-मुठा नदीत टाकला जात असून यामुळे पर्यावरण संरक्षण कायदा, जल प्रदूषण प्रतिबंधक कायदा तसेच ग्रामस्वच्छता नियमांचे सर्रास उल्लंघन होत आहे.



तक्रारीत नदी प्रदूषणास जबाबदार असणाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच स्थानिक ग्रामपंचायत किंवा नगरपरिषदेला कठोर निर्देश देऊन नदीत कचरा टाकण्याची प्रथा थांबवावी, पर्यायी कचरा व्यवस्थापन व्यवस्था , जसे की कंपोस्टिंग व कचरा प्रक्रिया केंद्र उभारावीत, अशी ठोस मागणी करण्यात आली आहे.

या तक्रारीस डॉ. मानसी पवार, संजय भास्कर आवारे, धनंजय भास्कर गायकवाड (सचिव, आजाद समाज पार्टी - पश्चिम महाराष्ट्र) यांचा पाठिंबा असून खडकवासला पाटबंधारे विभाग, सिंचन भवन, मंगळवार पेठ येथेही याबाबत नोंद करण्यात आली आहे.

नदी प्रदूषणाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून कठोर पावले उचलावीत, अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात येईल, असा इशाराही तक्रारदारांनी दिला आहे.

# तलाई येथे मशरूम शेती व्यवसाय प्रशिक्षणाबाबत मार्गदर्शन




**दैनिक वादळ वार्ता**
**रविंद्र वळवी । मोलगी**

धडगाव तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत तलाई येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना अंतर्गत कालो कुणबी सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मशरूम शेती व्यवसाय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमात राजेंद्र वसावे व लीलाताई वसावे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेण्यात आले. या मशरूम शेती व्यवसायाच्या उद्देश म्हणजे बेरोजगार मुक्त गाव कुपोषण मुक्त गाव हे ध्येय समोर ठेवून कार्यशाळा पार पडली.

या प्रशिक्षणासाठी तलाई ग्रुप ग्रामपंचायत तलाई परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ग्रुप ग्रामपंचायत तलाई ग्रामपंचायत अधिकारी जाण्या पाडवी, सरपंच गोवालीबाई गौतम वसावे, सामाजिक कार्यकर्ते दशरथ वसावे, पुनम पाडवी ग्रामपंचायत सदस्य वैशाली वसावे अंगणवाडी सेविकाः गंगा वसावे, रीता पाडवी व नऊ अंगणवाडी सेविका, आशा सेविका, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहादा नगरपालिकेत खळबळ; जन्म-मृत्यू विभागातील महत्त्वाचे दस्तऐवज गायब



**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । प्रतिनिधी**

शहादा नगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील जन्म-मृत्यू विभागात गंभीर प्रकार उघडकीस आला असून, नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले दस्तऐवज अज्ञात व्यक्तींनी परवानगीशिवाय हलविल्याने पालिका प्रशासनात खळबळ उडाली आहे. मंगळवारी संबंधित विभागाची खोली तपासणीदरम्यान रिकामी आढळून आल्याने हा प्रकार समोर आला.माहिती मिळताच नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांनी तात्काळ पालिकेत धाव घेऊन पाहणी केली. इतकी मोठी हालचाल होऊनही प्रशासकीय प्रमुख व संबंधित अधिकाऱ्यांना याची पूर्वकल्पना नसल्याचे समोर आले आहे. मुख्याधिकारी साजिद पिंजारी यांनी दस्तऐवज हलविण्याबाबत कोणतीही परवानगी दिलेली नसल्याचे स्पष्ट केल्याने संशय अधिक बळावला आहे.जन्म-मृत्यूचे दाखले शैक्षणिक, मालमत्ता व विविध कायदेशीर कामांसाठी अत्यावश्यक असल्याने मूळ नोंदी गहाळ झाल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. नगराध्यक्ष पाटील यांनी सीसीटीव्ही फुटेज तपासून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई व गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले असून, या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे.

# शहादा तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत डोंगरगाव व पाडळदा अव्वल



**दैनिक वादळ वार्ता । नंदुरबार । प्रतिनिधी**

पंचायत समिती शहादा शिक्षण विभागाच्या वतीने 'खेलो इंडिया' उपक्रमांतर्गत आयोजित तालुकास्तरीय विद्यार्थी क्रीडा स्पर्धा वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर उत्साहात पार पडल्या. या स्पर्धांमध्ये कबड्डी, खो-खो तसेच मैदानी खेळांत डोंगरगाव व पाडळदा केंद्राच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत बाजी मारली.इयत्ता तिसरी ते आठवीच्या सुमारे ८०० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. कबड्डीमध्ये मुलांच्या छोट्या गटात डोंगरगाव, तर मोठ्या गटात पाडळदा संघ विजयी ठरला. मुलींच्या मोठ्या गटात डोंगरगाव संघाने प्रथम क्रमांक पटकावला. खो-खो प्रकारात पाडळदा केंद्राने वर्चस्व राखले. धावणे व लांब उडी या मैदानी स्पर्धांत विद्यार्थ्यांची चपळता व उत्साह दिसून आला. यशस्वी खेळाडूंचे जिल्हास्तरासाठी निवड झाल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# खडक मांजरी (ता. लोहा) येथे जि.प.प्राथमिक शाळेत स्वराज्य प्रेरिका राजमाता जिजाऊ जयंती उत्साहात साजरी

**दैनिक वादळ वार्ता**
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**



लोहा तालुक्यातील खडक मांजरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये सोमवार दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी स्वराज्य जननी मासाहेब जिजाऊ यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. हिरामण मोरे सर हे उपस्थित होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्रीराम कलणे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. ज्ञानेश्वर पवार सर यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी माधव माटोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.कार्यक्रमाची सुरुवात मासाहेब जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी जिजाऊंच्या चरित्रावर आधारित प्रभावी भाषणे सादर केली. यामध्ये आरुषी एडके, संध्या गणगोपले, तनुजा कापसे, सोनी चरण कापसे, व रुतुजा वारकड या विद्यार्थिनींनी मासाहेब जिजाऊंच्या कर्तृत्वपूर्ण जीवनावर प्रकाश टाकत स्वराज्य निर्मितीतील त्यांचे योगदान प्रभावीपणे मांडले.

यावेळी काही विद्यार्थिनींनी जिजाऊंच्या वेशभूषेत सादरीकरण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तसेच मासाहेब जिजाऊंच्या जीवनावर आधारित गीत गायनसादर करण्यात आले. या सादरीकरणाला उपस्थितांकडून भरभरून दाद मिळाली.कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापकयांनी मासाहेब जिजाऊंच्या जीवनचरित्रावर आधारित मनोगत व्यक्त करत, जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराजांना दिलेले संस्कार, राष्ट्रप्रेम, स्वराज्याची प्रेरणा व मूल्यशिक्षण यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दलची जाणीव वाढून राष्ट्रभक्ती, संस्कार आणि आदर्श मूल्यांची प्रेरणा मिळाल्याचे दिसून आले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकवृंद व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# नशिबावर नाही, स्व-कर्तृत्वावर विश्वास ठेवा-प्रा.जयपालसिंग शिंदे



**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । प्रतिनिधी**

तळोदा येथील विश्राम काका पाटील शैक्षणिक संकुलातील (कै.) सौ. जी. एफ. पाटील कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन व राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात प्रा. जयपालसिंग शिंदे यांनी विद्यार्थ्यांना नशिबाच्या रेषांपेक्षा स्वतःच्या कष्टांवर विश्वास ठेवण्याचे आवाहन केले. दैववाद टाळून कर्मवाद व बुद्धिवाद स्वीकारण्याचा संदेश त्यांनी दिला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सुरेखा आय. पाटील होत्या. उपप्राचार्य पी. बी. पाटील, एनएसएस सदस्य व प्राध्यापक उपस्थित होते. प्रास्ताविक काकासाहेब अनपट यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार भगवती पाटील यांनी मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077